UGC CARE LISTED
ISSN No. 2394-5990

# इतिहासाचार्य वि. का. राजवाडे मंडळ, धुळे
## या संस्थेचे त्रैमासिक

# ।। संशोधक ।।

पुरवणी अंक ९ – डिसेंबर २०२३ (त्रैमासिक)

- शके १९४४
- वर्ष : ९०
- पुरवणी अंक : ९

**संपादक मंडळ**

- प्राचार्य डॉ. सर्जेराव भामरे
- प्रा. डॉ. मृदुला वर्मा
- प्रा. श्रीपाद नांदेडकर

**अतिथी संपादक**

- प्रा. डॉ. सुभाष वाघमारे
- प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे

**✸ प्रकाशक ✸**

**श्री. संजय मुंदडा**

कार्याध्यक्ष, इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८, ९४०४५७७०२०

**कार्यालयीन वेळ**

सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवारी सुट्टी)

मूल्य रु. १००/-
वार्षिक वर्गणी रु. ५००/-, आजीव वर्गणी रु. ५०००/- (१४ वर्षे)

**विशेष सूचना :** संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्टने 'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

**अक्षरजुळणी :** सौ. सीमा शिंत्रे, वारजे-माळवाडी, पुणे ५८.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकेच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले आहे. या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

# जागतिक, सामाजिक शांतता आणि संत साहित्यातील उपयुक्त अभंग

**प्रा.डॉ आर.डी.शिंदे**
मराठी विभाग
कर्मवीर पुंजाबाबा गोवर्धने
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, इगतपुरी
फोन नं. : ८४२१९७८५१८ ईमेल rdshinde2012s@gmail.com

**सारांश :**

'हे विश्वची माझे घर' या सारख्या आनेक आदर्शवादी विचारांची मांडणी करीत संत ज्ञानेश्वरांनी समस्त मानवाला विश्वकल्याणाची हाक दिली. मानवाच्या, पर्यावरणाच्या आणि सृष्टीतील सर्व सजीवांच्या कल्याणासाठी त्यांनी परमेश्वराकडे पसायदान मागितले. संत ज्ञानेश्वरांच्या साहित्यसह सर्वच संत साहित्याने मानवाचे हित साधण्याबरोबरच समाजात सामाजिक ऐक्य, बंधुभाव, निर्माण करण्याबरोबरच, शुद्ध मनाने विठठलाची भक्ती करण्याचा मंत्र दिला. मानवाने आपले आचार, विचार शुद्ध राखण्यासाठी काय करावे.? मानवाचे हित कशात आहे.? हे हित कसे साध्य होईल.? याचे विवेचन अनेक अभंग व ओवींच्या माध्यमातून केले आहे. विचारी आणि ज्ञानी मानवाने काळाच्या ओघात आपल्या बुद्धीचातुर्याच्या जोरावर विविध क्षेत्रात प्रगती केली. मानवाने केलेल्या या प्रगतीमुळे तो गर्विष्ठ झाला. सत्ता, संपत्ती, पैसा यांच्या मागे धावू लागला. मानवाची हीच प्रवृत्ती जगभर वेगाने पसरू लागली. विविध देशांमध्ये आणि मानवामध्ये गर्व आणि अहंकार निर्माण झाला. परिणामी माणूस सत्ता, संपत्ती, जल, जमीन, जंगल, यांच्यावर अक्रमण करू लागला. परिणामी माणूस अधिक स्वार्थी झाला. तर दुसऱ्या बाजूला जगभर सत्ता, संपत्ती, जात, धर्म, लिंग, जमीन, पैसा, खनिज संपत्ती अशा विविध कारणांमुळे एकमेकांत संघर्ष सुरू झाले. धार्मिक विषमता वाढीस लागली. मानवी मनात मोठा स्वार्थ निर्माण झाला. सत्ता संघर्ष आणि स्वार्थामुळे माणसांची नितिमत्ता उध्वस्त झाली. अशा स्थितीत जगभर अशांतता निर्माण झालेली आहे. सत्ता संघर्षात विविध शस्त्रांचा आणि क्षेपणास्त्रांचा वापर होत आहे. दोन्ही महायुद्ध, विविध देशांचे अंतर्गत युद्ध यामुळे मानवाचे आणि पर्यावरणाचे मोठे नुकसान झालेले आहे. हे जगाने दोन्ही महायुद्धात पाहिले आहे. सत्ता संघर्षात माणूस, पर्यावरण आणि विविध जीवजंतूंचे इत्यादींचे रक्षण करणे काळाजी गरज बनलेली आहे. विश्वाच्या कल्याणासाठी आणि मानवाच्या रक्षणासाठी समाजाला नैतिक मूल्यांची, आदर्श विचारांची शिकवण मिळणे आवश्यक झालेले आहे. त्यासाठी संतांचे विचार पुन्हा समाजात रुजविण्याची आवश्यकता आहे. संत साहित्याचे वाचन केल्यानंतर मानवाच्या मनात होणाऱ्या परिणामाबद्दल डॉ राजन गवस लिहितात, "एक 'तुकाराम गाथा' वाचल्यानंतर मी आंतरबाह्य बदलून जाणं, एक ज्ञानेश्वरीचे पारायण करण्यात माझ्या जगण्याला कैकपटीनं उन्नती लाभणं, ग्रामगीता वाचल्यानंतर आंतरबाह्य माझ्या जगण्याकडं पाहण्याचा एक दृष्टीकोण बदलत जाणे आणि गाडगेबाबाचं एक कीर्तन ऐकल्यानंतर मी समाज बोधाला नव्या उर्मीने समोर जाणं, समाज शरीराला दुरूस्त करण्याच्या या सगळया थेरपी आहेत."[१] जगभर शांतता आणि माणूसकी निर्माण करावयाची असेल तर संत साहित्यातील विचारांची जगभर पेरणी करण्याची गरज आहे. आज पर्यंत संत साहित्यामुळे समाजात वैचारिक चळवळ निर्माण झाली. तीच चळवळ पुन्हा सुरु करण्याची गरज आहे.

**प्रास्ताविक :**

संत साहित्यातील ओवी आणि अभंगातून व्यक्त झालेल्या विचारांचे चिंतन केले असता, संत साहित्य हे मानवी जीवनाचे, पर्यावरणाचे आणि विविध जीवजंतूचे रक्षण करणारे आहे. आज समाजात मानवी स्वार्थामुळे आणि सत्ता संघर्षामुळे मानवाची नैतिकता संपून गेलेली आहे. ही अनैतिकता, माणसामाणसांमधील भेदभाव दूर करून समाजात आणि मानसाच्या मनात शांतता निर्माण करण्याची गरज आहे. संत साहित्याच्या माध्यमातून आदर्श विचारांची पेरणी केल्यामुळे, महाराष्ट्रात वैचारिक परिस्थिती चांगली आहे. त्यामुळे आज आदर्श साहित्य म्हणून संत साहित्याचा विचार कायम होत असतो. संत साहित्याने मानवी मनातील आणि समाजातील

ISSN No. 2394-5990

वाईट विचार दूर करीत माणसामाणसातील भेद दूर करीत विश्व कल्याण साधण्याचे प्रयत्न केले आहे. या बद्दलचे विवेचन करताना वडोदे मधुकर लिहितात, ''जिथे जन्म आहे तिथे मृत्यु होणारच. त्यातून सुटका नाही.भलेही मृत्युचि कारणे भिन्न असतील. सर्व पशु पक्षी प्राणीमात्रासाठी सारखाच नियम आहे. मग यामध्ये कुठलाच भेदभाव करीत नाही...''[२] जगभर सत्ता आणि संघर्षामुळे विश्व तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठयावर असताना, समाजात संत साहित्यातील विचारांची पेरणी व्हावी. कारण ङ्गअवघाची संसार सुखाचा करीन । आनंद भरीन तिन्ही लोकफ अशी भावना समाजात निर्माण होण्याची गरज आहे. मराठी संत साहित्यातील निवडक संतांच्या अभंगाच्या आधारे आपण संत साहित्यात आदर्श विचारांचा आणि त्यातून निर्माण होणाऱ्या परीणामाचा विचार करणार आहोत. असे आदर्श विचार हे विविध कारणामुळे होणारा सामाजिक असंतोष दूर करण्यास मदत होईल, हे संत साहित्यातील निवडक खालील घटकांच्या आधारे दिसून येईल.

**संशोधन पद्धती :**

सदर शोधनिबंधासाठी विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येत आहे.

**गृहिते :**

१) संत साहित्यात नैतिक मूल्यांचा विचार मांडलेला आहे. त्याचा शोध घेणे.

२) मानव आणि समाजात विविध कारणांमुळे होणाऱ्या अशांततेच्या कारणांचा विचार संत साहित्यात मांडलेला आहे. त्याचा शोध घेणे.

**१) संघर्षमय स्थिती दूर करण्यासाठी मनाची शुद्धता :**

मानवी मनात आणि समाजात आज विविध कारणांमुळे सातत्याने संघर्ष होत आहे. त्यामध्ये प्रामुख्याने मानवाचे मन आणि मनातील अशुद्ध विचार. सत्ता, पैसा आणि संघर्ष यांचे परिणाम व या परीणामामुळे मानवाची नैतिकता दूर गेलेली आहे. अनैतिक विचारसरणी वाढीस लागलेली आहे. अशी अनैतिक विचारसरणी दूर होण्यासाठी मानवाचे अंतःकरण शुद्ध करणे काळाजी गरज आहे. माणसांचे अंतःकरण शुद्ध असल्यास मानवाच्या मनात स्वार्थी आणि सत्ता संघर्षाची भावना निर्माण होणार नाही. अशुद्ध अंतःकरणामुळे मानवी मनात आणि विविध देशात सत्ता संघर्ष होत आहे. परिणामी जगात अशांतता निर्माण झालेली आहे. विश्वात शांतता निर्माण करण्यासाठी ङ्गहे विश्वची माझे घर म हे विचार पेरण्याची गरज आहे. माणसांमध्ये जात, पात, धर्म यांच्यावरून कोणत्याही प्रकारचा भेदाभेद करू नये. समाजात सामाजिक समता निर्माण व्हावी यासाठी जगतगुरु तुकाराम महाराज लिहितात,

''विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेद भ्रम अमंगळ।।
आइका जी तुम्ही भक्त भागवत। कराल ते हित सत्य करा ।।
कोणाही जिवाचा न घडो मत्सर । वर्म सर्वेश्वर पूजनांचे ।।
तुका म्हणे एका देहाचे अवयव। सुख दुःख जीव भोग पावे ।।''
(अ.क्र २१)

किंवा 'कोणाही जीवाचा न घडो मत्सर' या साख्या अभंगाचे वाचन केल्यास मानवाचे अंतःकरण शुद्ध होण्यास मदत होईल. मानवाचे अंतःकरण शुद्ध असणे आवश्यक आहे. या शुद्ध मनात चांगलेच विचार येतात. कोणबद्दल वैरभाव किंवा तिरस्कार निर्माण होत नाही. मानवाच्या मनात शुद्धता निर्माण करण्यासाठी संत साहित्याशिवाय दुसरे आदर्श साहित्य नाही. मनाच्या अशुद्धतेमुळे मनात अनेकदा संघर्षमय विचार येतात. मनातील हे वाईट विचार बदलल्यासाठी मन करारे प्रसन्न । सर्व सिद्धीचे कारण. माणसाचे मन शुद्ध होण्यासाठी मनात चांगल्या विचारांची पेरणी करणे आवश्यक आहे. समाजपरीवर्तनासाठी आणि आदर्श विचार पेरण्यासाठी संत निवृत्तीमहाराज महाराज लिहितात, ''नाचू कीर्तनाच्या रंगी । ज्ञानपदीप लावू जगी.'' समाजप्रबोधन करण्यासाठी समाजात ज्ञानाचा दीप लावण्याची गरज आहे. मानवाचे मन शुद्ध असण्यासाठी त्यांच्यात आदर्श विचारांची पेरणी करण्याची गरज आहे. त्यासाठी सर्व जात धर्म आणि पंथ यांच्यात कोणताही भेदभाव करू नये. कोणाचाही द्वेष नये. 'कोणाही जीवाचा न घडो मत्सर' त्यामुळे इतर साहित्यापेक्षा संत साहित्य उत्तम आहे. समाजातील संघर्ष टाळण्यासाठी चित्त चांगले असले पाहिजे. याची माहिती देताना संत तुकाराम महाराज लिहितात .

चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती ।
व्याघ्र हे न खाती सर्प तया ।।
विष ते अमृत आघात ते हित ।
अकर्तव्य नित होय त्यासी ।।

माणसाचे मन निर्मळ असेल तर कोणीच कोणाचे शत्रू होणार नाही. आज विविध गावात, राज्यात आणि देशात तो संघर्ष सुरु आहेत.ते सर्व संघर्ष मानवाची मानसिकता आणि बौद्धिकता स्थिर नसल्यामुळे होत आहे. त्यामुळे मानवाच्या कल्याणसाठी संतांची अभंगवाणी मनामनात पेरण्याची गरज आहे. ज्या विविध कारणामुळे समाजात संघर्ष होत आहे. ती कारणे दूर करण्याची गरज आहे. मानवतेची शिकवण देताना महात्मा बसवेश्वर लिहितात,

चोरी करू नको, हत्या करू नको
खोटे बोलू नको आत्मस्तुती करू नको

परनिंदा करू नको रागावू नको
हीच बहिरंगशुद्धी हीच अंतरंग शुद्धी

विश्वाच्या कल्याणसाठी संतानी आपल्या अभंगाच्या माध्यमातून चांगले संदेश दिलेले आहेत. हे विचार मनात आणि समाजात येणे गरजेचे आहे. चांगले विचार येणे आवश्यक आहे. वाईट विचारांचे जंतू आणि पाळून केले तर संपूर्ण समाज भय,उक्त जीवन जगू शकेल असा विश्वास वाटतो .

**२) जात, देव व धर्म इत्यादी कारणांमुळे होणारे संघर्ष :**

आज जगभर विविध जाती, धर्म, देव पंथ, यांच्यावरून विविध देशामध्ये आणि समाजामध्ये संघर्ष सुरू आहेत. संघर्षामुळे समाजाचे आणि विविध देशांचे मोठे नुकसान होत आहे. जाती, धर्म, पंथ या कारणामुळे मानवामध्ये कोणताही भेदभाव करू नये. या संघर्षामुळे कित्येक देश विनाशाकडे जात आहे. त्यामुळे अशा देशांना आणि समाजाला वाचविण्याची गरज आहे. आपण सर्व एकाच देवाचे लेकरे आहोत. हे तत्वज्ञान संतांनी समाजात मांडलेले आहे. आज जात आणि धर्म हे प्रामुख्याने संघर्षाचे कारण बनत आहे. हे दुर्दैवी आहे. समाजातील असंतोष दूर करण्यासाठी सामाजिक समता निर्माण करणाऱ्या संत विचारांची पेरणी करणे आवशयक आहे. जातीभेद दूर करण्यासाठी, संत चोखोबांचे अभंग महत्वाचे वाटतात. ते लिहितात 'ऊस डोंगा परी रस नोव्हे डोंगा । काय भुललाशी वरलिया रंगा ।' माणूस कोणत्याही जातीचा असू द्या, परंतु अशा माणसात माणूसकी असावी. माणसाने जर माणुसकी आणि मानवता जपली तरच मानव आणि माणूसकी जीवंत राहिल. आज देवांच्या नावावर आणि धर्माच्या नावावर सातत्याने संघर्ष होत आहे. दगडातील देवामुळे निर्माण होणाऱ्या संघर्षात माणूस मारला जाणे चुकीचे आहे. देव कुठे आहे.? याचा आदर्श विचार मांडताना संत तुकाराम महाराज लिहितात 'जे का रंजले गांजले । त्याशी म्हणे जो आपुले तोचि साधू ओळखावा। देव तेथेची जाणावा ।' गरीबांची सेवा करण्यातच देव आहे. मानवता, समानता आणि प्रेम यातच देव आहे. आज जगभर देवाच्या जातीच्या आणि धर्माच्या नावावर चालेला संघर्ष दूर करण्याची गरज आहे. त्यासाठी साने गुरूजी लिहितात, 'खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे' संतानी मांडलेल्या विचाराचे चिंतन करण्याची गरज आहे. समाजात धार्मिक तेढ निर्माण होऊ नये. सामाजिक पातळीवर कोणताही संघर्ष होऊ नये, हीच संतांची अपेक्षा आहे. संघर्षमय जगाला वाचविण्याची गरज आहे. बुडती जन न देखवे डोळा । म्हणून कळवळा येत असे ।। असा कळवला समस्त मानवाला येण्याची गरज आहे. जातीभेदामुळे समाजात मोठ्या प्रमाणात विषमता निर्माण होत आहे. या विषमतेमुळे समाजाची विभागणी झाली. अशा वेळी संत चोखामेळा म्हणतात, प्रभू विषमता नको समानता हवी । भेद नको न्याय हवा माणुसकी ती । समाजात मानवता आणि माणुसकी निर्माण करण्यासाठी संत विचारांची गरज आहे. देवाच्या नावाखाली समाजाची होणारी फसवणूक कशाप्रकारे होत असते.

**३) आर्थिक कारणामुळे होणारे संघर्ष :**

सत्ता आणि संपत्ती मिळविणे हे आज विविध देशांचे जगण्याचे तत्वज्ञान बनले आहे. आर्थिक लुट करणे, गरीबांचे आणि गरीब देशाचे आर्थिक शोषण करणे. हे काळाच्या ओघात सतत वाढत आहे. परिणामी माणूस आणि पर्यावरण धोक्यात आलेले आहे. सत्ता आणि संपत्ती मिळविण्यासाठी माणसाने आपली नितिमत्ता सोडली आहे. पैसा हा मिळालाच पाहिजे. त्यासाठी कोणत्याही चुकीचा मार्ग अथवा संघर्षाचा मार्ग मिळला तरी त्याचा स्वीकार करायचा. पैशासाठी दुस-यांचे नुकसान झाले. जगभर अशांतता निर्माण झाली, तरीही काहीही हरकत नाही. परंतु पैसा आणि संपत्ती मिळालीच पाहिजे. या भावनेतून संघर्ष निर्माण होत आहे. अशा मनोवृत्तीच्या माणसांना पैसा कसा आणि कोणत्या मार्गाने मिळवावा? हे सांगताना संत तुकाराम महाराज लिहितात,

जोडोनिया धन उत्तम व्यवहारे । उदास विचारें वेंच करी ।।
उत्तमचि गती तो एक पावेल । उत्तम भोगील जीव खाणी ।।
पर उपकारी नेणे परनिंदा । परस्त्रिया सदा बहिणी माता ।।

संत तुकाराम महाराजांची उत्तम व्यवहारातूनच धन कमवावे. चुकीच्या मार्गने धन मिळवू नका. चुकीच्या पद्धतीने धन कमविताना जगाचे नुकसान होत आहे. अशा परिस्थितीत संतांचे विचार मोलाचे ठरतात. पैसा सत्ता आणि संपत्ती मिळविण्याच्या नादात माणुसकी आणि पर्यावरण संपत आहे. ते वाचविण्यासाठी पुन्हा मानवता आणि माणुसकी निर्माण होण्यासाठी संत साहित्यातील विचार येणे गरजेचे आहे.

**४) पर्यावरणीय संपत्तीसाठी संघर्ष :**

मानवाच्या विकासासाठी पर्यावरण आणि पर्यावरणीय साधनसंपत्ती उपयुक्त असते. या साधनसंपत्तीमुळे अनेक देशांनी आपली प्रगती केलेली आहे. काळच्या ओघात मानवाने आणि विविध देशांनी पर्यावरणीय साधन संपत्तीची मोठी लुट करीत ते श्रीमंत झाले आहेत. आपल्याच देशातील साधन संपत्तीची लुट केल्याने ती संपण्याच्या मार्गावर असताना, दुसऱ्या देशातील साधनसंपत्ती मिळविण्यासाठी व तेथील संपत्तीवर अधिकार मिळविण्यासाठी संघर्ष सुरु आहे. आशा स्वार्थी मनोवृत्तीतून पर्यावरणाचे नुकसान करणाऱ्या देशांना पर्यावरणाचे महत्व सांगताना संत तुकाराम महाराज सांगतात

ISSN No. 2394-5990

वृक्षवल्ली आम्हा सोयरे । पक्षीही सुस्वरे आळविती ।।
येणे सुखे रुचे एकांटाचा वास । नाही गुण दोष आंगा येता ।।
आकाश मंडप पृथ्वी आसन । रमे तेथे मन क्रीडा करू ।।
कंथाकमंडलू देहउपचारा । जाणवितो वारा अवसरु ।।..

पर्यावरणाचे कोणीही नुकसान करू नये. आज पर्यावरणाचे नुकसान करीत कोणीही मोठा होणार नाही. पर्यावरण आणि विविध साधन संपत्तीचे जतन करणे आवश्यक आहे. माणसाचा पर्यावरण विषयकाचा स्वार्थीपणा पाहून महात्मा गांधी म्हणतात. ''पृथ्वी प्रत्येकाच्या गरजा पूर्ण करील, परंतु प्रत्येकाचा लोभ पुरा करू शकत नाही.''[३] मानवी लोभामुळे पर्यावरणाचे मोठे नुकसान होत आहे. पर्यावरण मानवाचे कल्याण करणारे आहे. मानवाचे हीत जपणारे आहे. संत ज्ञानेश्वर लिहितात नागरेची रचावी । जलाशये निर्मावी । महावने लावावी । नानाविधे । संत ज्ञानेश्वर यांचे वरील विचार पाहता त्यांनी पर्यावरणाचे रक्षण आणि महत्व सांगितलेले आहे.

**निष्कर्ष :**

सामाजिक आणि जागतिक पातळीवर शांतता निर्माण होण्यासाठी संत साहित्यातील विचार महत्वाचे आहेत. हे संत साहित्याचे वाचन करताना दिसून येत आहे. त्यामुळे समाजात विविध कारणामुळे होणारे संघर्ष टाळण्यासाठी आणि पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी संत साहित्याची गरज आहे. याचा प्रत्यय येतो. वरील विवेचनावरून आपणास पुढील निष्कर्ष काढता येतील –

१) मानवाच्या स्वार्थीपणामुळे जागतिक पातळीवर अशांतता निर्माण झालेली आहे.
२) जागतिक पातळीवर निर्माण झालेली अशांतता दूर करण्यासाठी संत विचार समाजात रुजवावेत.
३) संत साहित्याच्या वाचनाने मानवाच्या विचारसरणीत बदल होतो.

**शिफारस :**

१) समाजात सामाजिक एकता आणि समानता आणि बंधुभाव निर्माण होण्यासाठी संत साहित्याचा अभ्यासक्रम लावणे गरजेचे आहे.
२) माणूस, पर्यावरण रक्षण करण्याबरोबर जागतिक पातळीवर शांतता निर्माण व्हावी, यासाठी संत साहित्यातील मूल्य विचारांचा प्रसार करणे गरजेचे आहे.
३) सामाजिक संघर्ष परीस्थितीत संत वचने समाजापर्यंत पोहचविणे आवश्यक आहे.

**समारोप :**

संत सहित्य हे मानवी जीवनाचे चिंतन करणारे आहे. मानवाच्या मनात दया क्षमा शांती मिळविण्यासाठी त्याचे मन आणि अंतरंग शुद्ध असावे. संत साहित्यात अनेक आदर्श विचारांची मांडणी केलेली आहे. हे विचार जागतिक पातळीवरील लोकांपर्यंत पोहचविणे काळाची गरज आहे. संत साहित्यातील विचार जगाला विचार करायला लावेल. मनाची शुद्धता निर्माण करेल.त्यामुळे जागतिक पातळीवर शांतता निर्माण होईल, अशी अपेक्षा आहे.

**संदर्भ ग्रंथ :**


१. डॉ.गवस राजन, 'संत साहित्यातील समाजिक बंडखोरी आकलन आणि चिकित्सा', संपा .डॉ कल्पना एस.बोरकर, विजय प्रकाशन नागपूर, प्रथम आवृत्ती, २ जाने २०१९ पृष्ठ २
२. वडोडे मधुकर, 'विष्णुमय जग', दिलीपराज प्रकाशन,पुणे, पहिली आवृत्ती १ नो २०२३ पृष्ठ २९
३. विनायक पाटील. 'उत्कर्षवाटा', शब्दालय प्रकाशन श्रीरामपूर, पहिली आवृत्ती जून २०१९ पृष्ठ ३०.


■■■